# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २६ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## नेत्यांच्या स्मारकांपेक्षा रुग्णालये आणि शाळांचीच गरज!

देशातील आणि राज्यातील राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस खालावत असताना, केवळ राजकीय नेत्यांची किंवा महापुरुषांची भव्य स्मारकं उभारून मतांचे राजकारण करण्याची जणू चढाओढच लागली आहे. अशा परिस्थितीत स्मारकांऐवजी शाळा आणि रुग्णालये उभारा, अशी जनहिताची भूमिका घेणे म्हणजे थेट राजकीय रोष ओढावून घेणे ठरते. छत्रपती संभाजीनगर येथील जालना रोडवरील शासकीय दूध डेअरीच्या जागेवर एका दिवंगत नेत्याचे स्मारक...

---> अग्रलेख - पान 2 वर


### पाहिजेत

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


# दिल्ली-मुंबई एक्सप्रेस-वे वर भीषण अपघात! छत्रपती संभाजीनगरातील 4 व्यापाऱ्यांचा जागीच मृत्यू, दोघे गंभीर जखमी

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** दिल्ली-मुंबई ८ लेन एक्सप्रेस-वेवर आज गुरुवारी सकाळी एक अत्यंत भीषण अपघाताची घटना घडली. छत्रपती संभाजीनगर येथून दिल्लीला जाणाऱ्या व्यापाऱ्यांची भरधाव कार एका चालत्या ट्रकला मागून जोरात धडकली. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात संभाजीनगरातील ४ व्यापाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

हा अपघात मध्य प्रदेशातील मंदसौरनजीक सीतामऊ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तितरोद परिसरात सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडला. छत्रपती संभाजीनगर येथील ६ व्यापारी मित्र कारने (एमएच २० जीई ७३५९) दिल्लीला मोबाईलचे सुटे सामान आणि इक्विपमेंट खरेदी करण्यासाठी जात होते. मात्र, मध्य प्रदेशात मंदसौरजवळ चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव कार थेट पुढे चाललेल्या एका अवजड ट्रकच्या मागच्या भागात जाऊन घुसली.




कारचा वेग इतका प्रचंड होता की, धडक बसताच कारचा पुढचा भाग चक्काचूर होऊन थेट बोनेट सीटपर्यंत मागे सरकला. सचिन गंगाधर गजभारे (रा. नाहर क्लिनिकसमोर, छत्रपती संभाजीनगर) संदीप नवनाथ रामराव बोरसे (रा. सावंगी, छत्रपती संभाजीनगर) राजेंद्र भावराम कोवडे (रा. छत्रपती संभाजीनगर) रवींद्र भागवत काळे (रा. शास्त्रीनगर, जवाहर कॉलनी परिसर, छत्रपती संभाजीनगर येथील मृत झाले असून अब्दुल खलील अब्दुल समद (वय ३०, रा. छत्रपती संभाजीनगर) उमर इस्माईल जागीरदार (वय ३२, रा. गंगापूर अपघात हे जखमी झाले. इतका भीषण होता की कारमधील लोक आतमध्येच अडकून पडले होते. महामार्गावरील इतर वाहनधारकांनी तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले.

कारचा पत्रा कापून आत अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी तब्बल एक तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले. घटनेची माहिती मिळताच सीतामऊ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी आणि मृतांना कारबाहेर काढून तातडीने सीतामऊ सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. अपघात घडताच ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच छत्रपती संभाजीनगरमधून मृत व जखमींचे नातेवाईक मंदसौरसाठी रवाना झाले आहेत. ते रात्री उशिरापर्यंत किंवा शुक्रवारी सकाळपर्यंत तिथे पोहोचतील. त्यानंतर मृतदेहांचे शवविच्छेदन करून ते नातेवाईकांच्या स्वाधीन केले जातील. कारचा वेग मर्यादेपेक्षा जास्त असल्याने हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगरच्या व्यापारी वर्गावर मोठी शोककळा पसरली आहे.

## थोडक्यात वार्ता

### व्हेनेझुएलात दोन शक्तिशाली भूकंप, इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या, 10 हजार लोकांचा मृत्यू झाल्याची भीती

**कराकस :** व्हेनेझुएलाची राजधानी आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कराकस शहराला बुधवारी संध्याकाळी भूकंपाचे दोन शक्तिशाली धक्के बसले. 7.1 आणि 7.5 रिश्टर स्केल क्षमतेच्या भूकंपाच्या या धक्क्यांनी कराकस शहरातील इमारती आणि घरे अक्षरशः पत्त्यासारखी कोसळली. या दुर्घटनेत तब्बल 10 हजार नागरिकांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. बुधवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कराकस शहराला हे भूकंपाचे धक्के बसले. या शक्तिशाली भूकंपानंतर काही नागरिक त्यांच्या घरांमधून बाहेर पडत धावत रस्त्यावर आले. हे भूकंपाचे धक्के इतके शक्तिशाली होते की, अनेक इमारती पूर्णपणे कोसळल्या आहेत.

कराकस शहरात फक्त इमारतींचे ढिगारे उरले आहेत. लोकांना आसरा घेण्यासाठीही जागा शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे काल भूकंपाच्या धक्क्यानंतर येथील नागरिकांना रात्रभर रस्त्यावरच राहावे लागले.

व्हेनेझुएलाचे गृहमंत्री डियोस्डाडो काबेयो यांनी दिलेल्या माहितीनुसार, कराकस शहरातील अल्तामिरा भागात सर्वाधिक नुकसान झाले असून तेथील परिस्थिती चिंताजनक आहे. या परिसरातील अनेक इमारती आणि घरं पडली आहेत. भूकंपाचे आणखी हादरे बसू शकतात, या शक्यतेने सरकारने लोकांना पुन्हा घरात जाऊ नये, अशी सूचना दिली होती. या दुर्घटनेत हजारो नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे.

नॅशनल हॉलिडे असल्यामुळे भूकंपावेळी अनेक लोक आपल्या घरी उपस्थित होते. स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी 6.04 वाजता भूकंप आला. भूकंपाचे केंद्र कराकासच्या पश्चिमेला मोंटालबान क्षेत्रात होते. हा झटका इतका तीव्र होता की कोलंबियाची राजधानी बोगोटापर्यंत याचे हादरे जाणवले. या झटक्यांची तीव्रता त्रूजिलो, याराकुई, काराबोबो, अरागुआ, मिरांडा, कराकास आणि ला गुआइरा या ठिकाणी जाणवली.

एका मिनिटात भूकंपाचे दोन शक्तिशाली धक्के बसल्यामुळे कराकस शहराची वाताहात झाली आहे. हे भूकंपाचे धक्के इतके शक्तिशाली होते की, मोठमोठ्या इमारती गदागदा हलून जमीनदोस्त झाल्या. हे दृश्य पाहताना अनेकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. भूकंपाचे धक्के बसले तेव्हा लोकांना जमिनीवर उभे राहणेही मुश्कील झाले होते. या इमारती एकाचवेळी कोसळल्यामुळे कराकस शहराच्या आकाशात धुळीचे प्रचंड लोट उठले होते. यानंतर व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांनी देशात आणीबाणीची घोषणा केली आहे.

### बांधकाम सुरु असलेली इमारत कोसळली

**कोलकाता :** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे बुधवारी दुपारी मोठी दुर्घटना घडली. ताराताला परिसरातील बांधकाम सुरू असलेली एक इमारत अचानक कोसळल्याने अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, किमान दोन जणांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात असली तरी अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नाही. ही घटना दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास ब्रेस ब्रिज रेल्वे स्थानकाजवळील ऑक्टेव्हियस टी अँड इंडस्ट्रीजच्या गोदाम परिसरात घडली. स्थानिकांच्या माहितीनुसार, इमारत कोसळली तेव्हा आत २५ ते ३० कामगार उपस्थित होते. मिळालेल्या माहितीनुसार, तीन मजली लोखंडी आणि सिमेंटच्या शेडचे बांधकाम आणि नूतनीकरणाचे काम सुरू होते. अचानक इमारतीचा वरचा भाग कोसळल्याने संपूर्ण रचना ढासळली आणि अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगारा हटवण्यासाठी बुलडोझर, जेसीबी आणि स्टील कटिंग मशीनच्या मदतीने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.



बुधवारी पडलेल्या मुसळधार पावसामुळे अमरप्रित चौकात असे तळे साचून वाहतुकीस धोका निर्माण झाला.जालनारोड पोस्ट ऑफिसलाही पावसाच्या साचलेल्या पाण्याने वेढले. दरवर्षीच ही अडचण असूनही मनपा प्रशासनाला तेथे मुरूम व भराव टाकण्याचे शहाणपण सुचलेले नाही.

## 'तू बहोत मस्ती मे था...' म्हणत तडीपार गुन्हेगारावर हर्सूलच्या जहाँगीर कॉलनीत भररस्त्यात चाकूहल्ला

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील हर्सूल जवळील जहाँगीर कॉलनी परिसरात जुन्या वादाच्या कारणावरून एका तडीपार गुन्हेगारावर तीन जणांनी भररस्त्यात धारदार चाकूने हल्ला चढवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. "तू बहोत मस्ती मे था..." असे म्हणत हल्लेखोरांनी तरुणाला बेदम मारहाण करून त्याच्या मांडीवर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात संबंधित तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर शासकीय घाटी रुग्णालयात तातडीने उपचार करण्यात आले. या खळबळजनक घटनेची माहिती मिळताच हर्सूल पोलिसांनी तात्काळ पावले उचलत पीडित तरुणाच्या घरी जाऊन त्याचा जबाब नोंदवला असून, तीन जणांविरुद्ध बुधवारी, २४ जून २०२६ रोजी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## बीएलओ बैठकीदरम्यान नियोजन सभागृहाला अचानकपणे लागली आग



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक 25 जून बी एल ओ ची बैठक सुरू असताना अचानक आग लागल्याने बाथरूम परिसरात लागलेल्या आगीत या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही अग्निशामक दलाने तात्काळ धाव घेतली व आग आटोक्यात आणली.

बी एल ओ ची बैठक दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आली होती झालेल्या पहिल्या सत्रात दुपारी अंदाजे दोन ते अडीच च्या दरम्यान सभागृहाच्या पाठीमागील बाजूस बाथरूम परिसरात अचानक आगीचे कारण त्यातला स्पष्ट होऊ न शकल्यामुळे विद्युत बिघाडामुळे आग लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले अग्निशामक घटनास्थळी दाखल होऊन आयोजनाचे काम चोक बजावले या दरम्यान नियोजन सभागृहाच्या पाठीमागील बाजूचा भाग जळून खाक झाला होता परंतु सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दरम्यान या आगीमुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील वीज पुरवठा खंडित झाला त्यामुळे काय कार्यालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाला प्रशासनाने तात्काळ काही उपाययोजना सुरू केल्या. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

## मध्यवर्ती बँक निवडणुकीत तीन संचालकाची बिनविरोध निवड

### माजी आ. वरपूडकर माजी आ. बोर्डीकर व तुषार दुधाटेयांचा समावेश

हिंदू प्रकाश वार्ता - प्रतिनिधी



**परभणी:** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे निवडणुकीसाठी दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली आहे तीन संचालकाची बिनविरोध निवड झाल्याने व परभणी पालम जिंतूर येथील संचालक बिनविरोध निवड झाल्याचे दिसत आहे गंगाखेड तालुक्यात आ डॉ रत्नाकर गुट्टे ओंकेश सानप, तर औंढा तालुक्यात राजेश साहेबराव पाटील, यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत नऊ जुलैपर्यंत अर्ज परत घेण्याची मुदत आहे गंगाखेड औंढा येथील उमेदवार अपिलात जाण्याची शक्यता आहे अपिलाच्या निर्णयानंतर येथील चित्र स्पष्ट होईल सध्या तरी या जागांना बिनविरोध म्हणता येणार नाही परभणी हिंगोली असे कार्यक्षेत्र असलेल्या मध्यवर्ती बँकेच्या सन 2026 व 2031 या कालावधीसाठी संचालक मंडळ निवडण्याकरिता प्रक्रिया सुरू झाली असून मंगळवार 23 जून रोजी अर्ज करण्याचे शेवट चा दिवस होता प्राथमिक कृषी पत पुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून परभणी तालुक्यातून माजी आमदार सुरेश अंबादास वरपूडकर व समशेर सुरेशराव वरपुडकर यांचे अर्ज दाखल झाले आहेत तिकीट एक अर्ज मागे घेतल्यास या जागेची निवडणूक बिनविरोध होईल अशी स्थिती जिंतूर तालुक्यातील आहे.

## महिपत पाटील मामा चौकात भरदिवसा चाकूचा धाक; पवन गवळीला संपविण्याची धमकी

### जवाहर कॉलनी परिसरात दहशतीचे वातावरण; तिघा भावांविरुद्ध जवाहरनगर पोलिसांत गुन्हा दाखल

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जवाहर कॉलनी परिसरात भरदिवसा चाकूचे प्रदर्शन करून दहशत माजविण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महिपत पाटील मामा चौक येथे एका व्यक्तीला धमकावत पवन गवळी याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याप्रकरणी तिघा भावांविरुद्ध जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत रुपेश शंकरराव पेरकर (वय ३२, रा. अरिहंतनगर, जवाहरनगर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. २४ जून) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिपत पाटील मामा चौक येथे उभे असताना आरोपी अजय जितेंद्र कांडे, वीर उर्फ लिंबराज जितेंद्र कांडे आणि जय जितेंद्र कांडे (सर्व रा. बालाजीनगर) हे तेथे आले.

फिर्यादीनुसार, आरोपी अजय कांडे याच्या हातात मोठा धारदार चाकू होता. त्याने चाकू हवेत फिरवत परिसरात दहशत निर्माण केली. त्यानंतर फिर्यादीला उद्देशून "पवनच्या सासऱ्याने आमच्याविरोधात तक्रार कशी दिली, त्याला पाहतो. पवन गवळी कुठे आहे, त्याला बोलावून घे," असे म्हणत धमकावले. यावेळी तिघांनी शिवीगाळ करत पवन गवळी याला ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

भररस्त्यात घडलेल्या या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सार्वजनिक ठिकाणी शस्त्राचे प्रदर्शन करून दहशत पसरविण्याच्या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या प्रकरणी जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६४/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३५२, ३५१(२), ३(५), भारतीय हत्यार कायदा कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार वानखेडे पुढील तपास करीत आहेत.

## पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून जिल्ह्याला रु. 1032.34 कोटी




**जिंतूर प्रतिनिधी :** जिंतूर (दि. २५ जून) पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून परभणी जिल्ह्याला रू.१०३२.३४ कोटींच्या विकास गुंतवणूकीतून रस्ते, आरोग्य, प्रशासन आणि शिक्षण क्षेत्राला नवी गती मिळणार तर जिंतूर तालुक्याला रस्त्यांच्या विकासासाठी ३८० कोटी मिळाले आहेत.

यात जिंतूर- शेवडी माणकेश्वर - येलदरी - सेनगाव या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून घेतला आहे. या विकास गुंतवणुकी मुळे जिंतूर तालुक्यातील रस्ते जाळे अधिक सक्षम, आधुनिक आणि भविष्योन्मुख होणार आहे, यामुळे दळण वळणाच्या सुविधा अधिक बळकट होत गावागावांतील संपर्क अधिक सुलभ आणि गतिमान होईल तसेच सुदृढ रस्ते, वेगवान प्रवास आणि विकासाला नवी दिशा देणारा हा निर्णय जिंतूर तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. तसेच हा मुख्य मराठवाडा व विदर्भ यांना जोडणाराअसल्याने याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

माध्यमाशी बोलताना असे मत पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर यांनी व्यक्त करत या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार यांचे आभार मानले आहेत.

### "खरं की काय"




## कुणबी जात प्रमाणपत्रांचे वाटप मुदतीत करा; विभागीय प्रशासनाचे आठही जिल्ह्यांना कडक आदेश

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र आणि त्यांच्या पडताळणीची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी महसूल व प्रशासकीय यंत्रणेने आता कंबर कसली आहे. मराठा आरक्षण उपसमितीने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करत, संपूर्ण छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये निर्धारित कालमर्यादेत प्रमाणपत्रे वाटप करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. विशेष म्हणजे, नागरिकांचे अर्ज सरकारी कार्यालयांमध्ये विनाकारण पडून राहणार नाहीत याची दक्षता घेतानाच, प्रलंबित प्रकरणांवर नियमांच्या चौकटीत राहून तातडीने अंतिम निर्णय घेण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामुळे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये जात प्रमाणपत्र वाटपाच्या कामाला वेग मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संदर्भातील सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात नुकतीच एक उच्चस्तरीय आढावा बैठक संपन्न झाली. प्रभारी विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून छत्रपती संभाजीनगर,



जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांमधील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या महत्त्वपूर्ण बैठकीला अपर आयुक्त मंजुषा मिसकर आणि तहसीलदार के. के. भदाणे यांची प्रत्यक्ष उपस्थिती होती, तर विभागातील सर्व जिल्ह्यांचे जात पडताळणी समितीचे अध्यक्ष, उपविभागीय अधिकारी (SDO) आणि संबंधित तालुक्यांचे तहसीलदार या बैठकीत ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले होते. या वेळी जिल्हानिहाय प्राप्त झालेले एकूण अर्ज, आतापर्यंत निकाली काढलेली प्रकरणे, तांत्रिक कारणांमुळे अवैध ठरलेले अर्ज आणि प्रलंबित राहिलेल्या अर्जांची सविस्तर आकडेवारी कारणांसह सादर करण्यात आली. बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी स्पष्ट केले की, मराठा आरक्षण उपसमितीच्या सूचनांनुसार प्रत्येक जिल्ह्याने शासनाच्या नियमांचे पालन करून जलदगतीने अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. हे सर्व अहवाल आगामी काळात शिंदे समितीसमोर सादर केले जाणार असल्याने कामात कोणतीही शिथिलता खपवून घेतली जाणार नाही. प्रशासकीय नियमानुसार कोणताही अर्ज ९० दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित राहता कामा नये, अशी स्पष्ट मुदत त्यांनी आखून दिली आहे. सध्या ज्या प्रकरणांना ९० दिवसांपेक्षा अधिक काळ झाला आहे, त्यांचा प्राधान्याने आणि नियमानुसार तातडीने निपटारा करण्यावर त्यांनी भर दिला. याच बैठकीत अपर आयुक्त मंजुषा मिसकर यांनीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. अर्जदारांना वेळेत सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार असल्याचे सांगत त्यांनी, जे अर्ज काही त्रुटींमुळे अवैध ठरवले जात आहेत, त्यामागील ठोस आणि स्पष्ट कायदेशीर कारणे अर्जावर नमूद करणे आवश्यक असल्याचे सांगितले, जेणेकरून नागरिकांमध्ये कोणताही संभ्रम राहणार नाही.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## टँकरमाफियांची मनमानी आणि पालिकेचा उशिरा आलेला शहाणपणा

पुणे शहरात उन्हाळ्याच्या दिवसांत किंवा पाणी कपातीमुळे निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईचा गैरफायदा घेऊन नागरिकांची उघड लुबाडणूक करणाऱ्या टँकरमाफियांवर अंकुश आणण्यासाठी अखेर पुणे महानगरपालिकेला जाग आली आहे. पालिकेच्या भरणा केंद्रांवरून केवळ साडेसातशे ते साडेअकराशे रुपयांमध्ये भरला जाणारा पाण्याचा टँकर सर्वसामान्य नागरिकांना अडीच ते तीन हजार रुपयांना विकला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हक्काच्या पाण्यासाठी आधीच त्रस्त असलेल्या पुणेकरांची ही आर्थिक लूट म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत स्थायी समितीच्या अध्यक्षांनी टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि नियमनबद्ध करण्यासाठी सर्वसमावेशक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत,ही प्रशासकीय पातळीवर योग्य पाऊल असले तरी आजवर या माफियांना अभय देणाऱ्या यंत्रणेवरही कठोर कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे. शहरातील टँकर व्यवस्थेत अत्यंत मोठ्या प्रमाणात त्रुटी आणि गैरव्यवहार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महानगरपालिकेचे अधिकारी आणि खाजगी टँकर चालक यांच्या संगनमताशिवाय अशी मोठी लूट होणे अशक्यप्राय आहे. पालिकेने आता केवळ कागदावर नियम न बनवता प्रत्येक टँकरवर अधिकृत दरफलक लावणे, जीपीएस यंत्रणा बसवणे आणि मोबाईल ॲपद्वारे टँकर ट्रॅकिंग सुविधा उपलब्ध करणे यांसारख्या तांत्रिक सुधारणा तातडीने अंमलात आणल्या पाहिजेत. 'पहिली मागणी–पहिला पुरवठा' हे तत्त्व प्रामाणिकपणे राबवले गेले, तरच यातील वशिलेबाजी आणि कृत्रिम टंचाईला आळा बसेल. याशिवाय, शाळा, रुग्णालये, पोलीस ठाणी आणि अग्निशमन केंद्रांना प्राधान्याने पाणीपुरवठा करण्याचे निर्देश स्वागतार्ह आहेत. या समस्येचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे टँकर चालकांचा बेजबाबदारपणा आणि पाण्याच्या गुणवत्तेशी होणारी तडजोड हा आहे. शहरात अनेकदा टँकरमुळे होणाऱ्या अपघातांच्या बातम्या समोर येतात. या पार्श्वभूमीवर टँकर चालकांची वैद्यकीय तपासणी, मद्यपान आणि अंमली पदार्थ चाचणी सक्तीची करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांना पुरवले जाणारे पाणी स्वच्छ आणि पिण्यायोग्य आहे की नाही, यासाठी पाण्याची नियमित तपासणी आणि क्लोरीनेशन करणे गरजेचे आहे. जे खाजगी टँकर मालक किंवा चालक नियमांचे उल्लंघन करतील, त्यांना थेट काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे धाडस पुणे पालिकेने दाखवले पाहिजे. स्थायी समितीने नागरिकांच्या तक्रारींसाठी हेल्पलाईन सुरू करून चोवीस तासांत तक्रारी निकाली काढण्याची व्यवस्था उभी करण्याचे आदेश दिले आहेत. पालिकेचा हा निर्णय कागदावर न राहता प्रत्यक्ष जमिनीवर उतरला, तरच पुणेकरांना या टँकरमाफ्यांच्या त्रासातून सुटका मिळेल. टँकर माफियांच्या मुसक्या आवळतानाच, पुणे शहराला टँकरमुक्त करण्यासाठी महापालिकेने जलवाहिन्यांचे जाळे आणि समान पाणी पुरवठा योजना वेळेत पूर्ण करण्यावर दीर्घकालीन भर दिला पाहिजे. तोपर्यंत या नव्या नियमावलीची कडक अंमलबजावणी करून सर्वसामान्यांना दिलासा देणे हेच प्रशासनाचे मुख्य कर्तव्य आहे.

## दारूसाठी पिण्यासाठी पैसे न दिल्याने पत्नीचा केला खून



हिंदूप्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** जिंतूर तालुक्यातील बोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या धानोरा देवगाव पतीने पत्नीच्या डोक्यात लोखंडी रोड घालून तिची निर्गुण हत्या केल्याची घटना गुरुवार २५ जून रोजी घडली अधिक माहिती अशी की पतीला दारूचे व्यसन जडले होते व तो वारंवार आपल्या पत्नीकडे पैशाची मागणी करत होता अशीच मागणी आपल्या पत्नीकडे केली दारू पिण्यासाठी पैसे व सोन्याचे दागिने रागाच्या भरात निर्गुण हत्या केल्याची चर्चा गावात होत आहे मयत महिलेच्या नातेवाईकांकडून या परिसरात शोकळ पसरली आहे बोरी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत चालू होती.

बोरीतून जवळ असलेल्या धानोरा देवगाव या गावातील आरोपी गजानन ज्ञानेश्वर कोठे वय 44 वर्ष हा त्याची पत्नी दोन मुलासह हात होते काही कारणामुळे 25 जून रोजी साडेबारा वाज त्याचा पत्नी सोबत वादविवाद झाला या वादाचे रूपांतर मोठ्या भांडणातून गजानन कुठे याने पत्नी मीराच्या डोक्यात लोखंडी घालून तिचा निर्गुण खून केला परिसरात मोठ्या किंकाळ्या व आवाज आल्याने आजूबाजूचे लोक जमा झाले वर्मी मार लागल्याने मीराचा जागीच मृत्यू झाल्याचे अंदाजनागरिकांनी व्यक्त केला.मीराला रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहून परिसरातील नागरिक घाबरून व चक्रावून गेले या घटनेनंतर मताचे पार्थिव बोरी तालुका जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणी करून मयत मृत झाल्याचे घोषित केले या घटनेची माहिती मिळताच हिंगोली जिल्ह्यातील शेमसुरा तालुका कळमनुरी येथील मैतांचे आई-वडील भाऊ व इतर नातेवाईक यांनी बोरी येथे येऊन रुग्णालयात धाव घेतली रडण्याचे ओरडण्याचा आवाजाने रुग्णालय परिसर वातावरण दरम्यान सायक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांनी धानोरा देवगाव येथे घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा करून तपास कामाला सुरुवात केली आहे पोलीस उपनिरीक्षक यशंत थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली शेख वसीम राजेश जटाळ विशाल लाड श्रीराम दंडवते सय्यद दिशान ज्ञानेश्वर कुटे कारवाईचे काम करत आहेत. दारूचे व्यसन जडले होते.

# शतकानुशतके दडपलेल्या समाजाला न्याय, शिक्षण देणारा लोककल्याणकारी राजा: आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते अनेक पिढ्यांच्या जीवनाला दिशा देणारे ठरते. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्थान अत्यंत अग्रक्रमाचे आहे. त्यांनी आपल्या राजसत्तेचा उपयोग वैभव, सत्ता आणि सुखसोयींसाठी न करता समाजातील शोषित, पीडित, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीसाठी केला. म्हणूनच इतिहास त्यांना केवळ कोल्हापूर संस्थानचे राजे म्हणून नव्हे, तर सामाजिक न्यायाचे शिल्पकार, समतेचे उपासक आणि आरक्षणाचे जनक म्हणून ओळखतो.

आज आपण ज्या आरक्षण व्यवस्थेबद्दल बोलतो, ज्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा अभिमान बाळगतो, त्या विचारांची बीजे सर्वप्रथम शाहू महाराजांनी पेरली. त्यांनी वंचितांच्या डोळ्यातील अश्रूंना अधिकाराची भाषा दिली, गुलामगिरीत खितपत पडलेल्या समाजाला स्वाभिमानाची जाणीव करून दिली आणि बहुजन समाजाच्या भविष्याला संधीचे नवे क्षितिज उपलब्ध करून दिले.

२६ जून १८७४ रोजी जन्मलेल्या शाहू महाराजांचे बालपण राजघराण्यात गेले. परंतु राजवाड्याच्या भिंतीत राहूनही त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय शोषण यांची तीव्रता ओळखली. त्या काळात शिक्षण, नोकऱ्या, सत्तास्थाने आणि सामाजिक प्रतिष्ठा काही मोजक्या उच्चवर्णीय लोकांच्या हातात केंद्रित होती. बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता, मंदिरात प्रवेश नव्हता, सार्वजनिक विहिरींमधून पाणी घेण्याची मुभा नव्हती. अनेकांना माणूस म्हणून जगण्याचाही अधिकार नाकारला जात होता.ही परिस्थिती पाहून शाहू महाराजांच्या मनाला वेदना होत होत्या. त्यांनी ओळखले की, जोपर्यंत शिक्षण, रोजगार आणि संधी यांमध्ये समानता निर्माण होत नाही, तोपर्यंत सामाजिक न्याय अशक्य आहे.

सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी एक ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यांनी आपल्या संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय समाजासाठी ५० टक्के आरक्षण लागू केले. जगाच्या इतिहासात सामाजिक न्यायासाठी घेतलेल्या या निर्णयाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.हा निर्णय केवळ प्रशासनिक नव्हता; तो सामाजिक क्रांतीचा प्रारंभ होता. कारण त्या काळात बहुजन समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांपासून दूर ठेवले जात होते. अशा परिस्थितीत आरक्षण म्हणजे त्यांना दिलेली विशेष सवलत नव्हती, तर शतकानुशतके हिरावून घेतलेल्या हक्कांची परतफेड होती. शाहू महाराजांना माहीत होते की, समान संधी देण्यासाठी प्रथम असमानता दूर करावी लागते. म्हणून त्यांनी आरक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन बनवले.शाहू महाराजांचा विश्वास होता की, शिक्षणाशिवाय कोणताही समाज प्रगती करू शकत नाही. म्हणून त्यांनी बहुजन, दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतिगृहे सुरू केली. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. मुलींच्या शिक्षणालाही त्यांनी विशेष प्रोत्साहन दिले.त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे केवळ अक्षरज्ञान नव्हते; ते स्वाभिमान, आत्मविश्वास आणि आत्ममुक्तीचे साधन होते. शिक्षणामुळे माणूस स्वतःचे हक्क ओळखतो, अन्यायाविरुद्ध उभा राहतो आणि स्वतःच्या भविष्याचा शिल्पकार बनतो.आज समाजातील अनेक डॉक्टर, अभियंते, शिक्षक, अधिकारी आणि उद्योजक यांची यशोगाथा पाहताना शाहू महाराजांनी उभारलेल्या सामाजिक न्यायाच्या पायाची आठवण येते.

शाहू महाराजांनी अस्पृश्यतेला मानवतेवरील कलंक मानले. त्यांनी दलित समाजाला सार्वजनिक विहिरी, तलाव, शाळा आणि सरकारी कार्यालये खुली करून दिली. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले.त्या काळात अस्पृश्यांना माणूस म्हणूनही वागणूक दिली जात नव्हती. परंतु शाहू महाराजांनी त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, माणसाची श्रेष्ठता जन्मावर नव्हे, तर त्याच्या गुणांवर आणि कर्तृत्वावर ठरते.हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता. कारण तो हजारो वर्षांच्या जातीय वर्चस्वाला थेट आव्हान देणारा होता.

एक महत्त्वाची विशेष बाब म्हणजे राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक सुवर्ण अध्याय आहे. बाबासाहेबांच्या विचारांतील क्रांतिकारकता आणि शाहू महाराजांच्या कृतीतील धाडस यांचा संगम बहुजन समाजाच्या मुक्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याला आर्थिक आणि नैतिक पाठबळ दिले. त्यांनी बाबासाहेबांच्या नेतृत्वाची क्षमता ओळखली आणि बहुजन समाजाच्या भवितव्यासाठी त्यांच्यावर विश्वास ठेवला.यामुळेच पुढे भारतीय राज्यघटनेत सामाजिक न्याय, समता आणि आरक्षणाच्या तत्त्वांना घटनात्मक संरक्षण मिळाले.

राजर्षी शाहू महाराजांना माहीत होते की समाजातील असमानता दूर करायची



असेल तर शिक्षण हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहे. त्यांनी बहुजन समाजासाठी वसतिगृहे सुरू केली, शिष्यवृत्ती दिल्या, मोफत शिक्षणाची व्यवस्था केली आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना राबवल्या. त्यांच्या मते,

शिक्षणाशिवाय स्वातंत्र्य, समता आणि स्वाभिमान अशक्य आहे. याच काळात एका प्रतिभावान तरुणाचा उदय होत होता. तो तरुण म्हणजे भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. हाच तरूण जातीय अन्यायाचे चटके सहन करत करत, अपार संघर्षातून शिक्षण घेत घेत महान तेजस्वी सूर्यासारख्या व्यक्तिमत्त्वात शाहू महाराजांना भविष्यातील सामाजिक क्रांतीचा नेता दिसला. त्यांनी बाबासाहेबांना आर्थिक आणि नैतिक पाठबळ दिले. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या "मूकनायक" या वृत्तपत्राला शाहू महाराजांनी मदत केली. हा केवळ दोन व्यक्तींचा संबंध नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाच्या दोन शक्तींचा ऐतिहासिक संगम होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील अन्याय आणि विषमतेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी अनुभवलेली अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार यामुळे त्यांना समजले की केवळ दया किंवा सहानुभूती पुरेशी नाही; हक्क आणि अधिकार मिळाल्याशिवाय खरे स्वातंत्र्य मिळत नाही. म्हणून त्यांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा मंत्र दिला.बाबासाहेबांनी दलित, शोषित आणि वंचित समाजाला स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला, मंदिर प्रवेश चळवळी केल्या, पाणी हक्कासाठी सत्याग्रह केले आणि सामाजिक समतेसाठी अखंड लढा दिला. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले. संविधानातील मूलभूत हक्क, सामाजिक न्यायाची तत्त्वे आणि आरक्षणाची घटनात्मक तरतूद ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात.

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची ज्योत पेटवली, तर बाबासाहेबांनी त्या ज्योतीला संविधानाचे अभेद्य संरक्षण दिले. शाहू महाराजांनी आरक्षणाचा पाया रचला, तर बाबासाहेबांनी त्याला कायदेशीर आणि घटनात्मक स्वरूप दिले. शाहू महाराजांनी शिक्षणाची दारे उघडली, तर बाबासाहेबांनी त्या दारातून लाखो बहुजनांना आत्मविश्वासाने चालण्याची प्रेरणा दिली.या दोन्ही महामानवांच्या कार्याचे मूल्यमापन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की त्यांनी समाजातील तळागाळातील माणसाला केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्यासाठी विकास म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हती; तर समाजातील शेवटच्या घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळणे हेच खरे राष्ट्रनिर्माण होते.

आजच्या काळात सामाजिक न्याय, आरक्षण आणि समानतेबाबत अनेक चर्चा होत असतात. काही जण आरक्षणाकडे केवळ नोकरी किंवा शिक्षणातील सवलत म्हणून पाहतात. परंतु शाहू महाराज आणि बाबासाहेबांच्या विचारातून समजते की आरक्षण ही दया नसून ऐतिहासिक अन्यायाची दुरुस्ती आहे. शतकानुशतके वंचित ठेवलेल्या समाजघटकांना समान संधी देण्यासाठी ही व्यवस्था निर्माण झाली आहे.आपण आधुनिक भारतात जगत असलो तरी जातीय भेदभाव, सामाजिक विषमता आणि शैक्षणिक असमानता अजूनही पूर्णपणे नष्ट झालेली नाही. त्यामुळे शाहू महाराज आणि बाबासाहेबांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.

राजर्षी शाहू महाराजांच्या अगोदर देखील अनेक राजे आपल्या साम्राज्याचा विस्तार करत होती; परंतु शाहू महाराजांनी आपल्या जनतेच्या जीवनाचा विस्तार केला. त्यांनी लोकांवर केवळ राज्य केले नाही, तर त्यांचे दुःख समजून घेतले. ते राजवाड्यात राहणारे राजा नव्हते; ते जनतेच्या हृदयात राहणारे लोकनेते होते.त्यांनी शेतकरी, कामगार, महिला, दलित, मागासवर्गीय आणि गरीब घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्यासाठी शासन म्हणजे जनकल्याणाचे साधन होते. त्यामुळेच त्यांना "राजर्षी" ही उपाधी मिळाली.

राजर्षी म्हणजे राजपदावर असूनही ऋषितुल्य विचार आणि जनकल्याणासाठी समर्पित जीवन जगणारी व्यक्ती. शाहू महाराजांनी ही उपाधी आपल्या कार्यातून सार्थ ठरवली.

आजही समाजात आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विषमता पूर्णपणे संपलेली नाही. अनेक घटक अजूनही संधींच्या अभावामुळे मागे राहतात. अशा वेळी शाहू महाराजांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. आरक्षण ही कोणावर केलेली कृपा नसून सामाजिक समतेसाठी आवश्यक व्यवस्था आहे, हे त्यांनी शंभर वर्षांपूर्वी सिद्ध करून दाखवले. आरक्षणाचा उद्देश समाजात विभागणी करणे नसून, शतकानुशतके वंचित राहिलेल्यांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे.

शाहू महाराजांचे कार्य आपल्याला शिकवते की, समाजातील दुर्बल घटकांना सक्षम केल्याशिवाय राष्ट्राची खरी प्रगती होऊ शकत नाही.

आजची युवा पिढी तंत्रज्ञान, विज्ञान आणि जागतिक स्पर्धेच्या युगात जगत आहे. परंतु या प्रगतीसोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव असणेही आवश्यक आहे. शाहू महाराजांचे जीवन आपल्याला सांगते की, शिक्षणाचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नव्हे, तर समाजाच्या उन्नतीसाठी करावा.त्यांनी दाखवून दिले की, सत्ता आणि संपत्ती यांचे खरे मूल्य ते समाजकल्याणासाठी वापरले गेले तरच योग्य असते. त्यांच्या विचारांमधून समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक न्यायाचे धडे मिळतात.

राजर्षी शाहू महाराज हे केवळ एका संस्थानाचे राजा नव्हते; ते सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी वंचितांच्या अश्रूंना अधिकार दिला, गुलामगिरीला स्वाभिमान दिला आणि बहुजन समाजाला भविष्याची नवी दिशा दिली. त्यांनी दिलेले आरक्षण हे केवळ सरकारी नोकरीतील स्थान नव्हते, तर माणूस म्हणून जगण्याचा, शिकण्याचा, प्रगती करण्याचा आणि स्वप्ने पाहण्याचा अधिकार होता.

आज जेव्हा लाखो वंचित कुटुंबांतील मुले शिक्षण घेऊन अधिकारी, डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि उद्योजक बनत आहेत, तेव्हा त्या प्रत्येक यशामागे शाहू महाराजांच्या दूरदृष्टीची छाप दिसून येते.म्हणूनच इतिहासाच्या पानांवर त्यांचे नाव केवळ "आरक्षणाचे जनक" म्हणून नव्हे, तर "वंचितांच्या अश्रूंना अधिकार, गुलामगिरीला स्वाभिमान आणि बहुजनांना भविष्य देणारा लोककल्याणकारी राजा" म्हणून सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन सामाजिक समता, बंधुता आणि न्यायपूर्ण भारत घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**लेखक**
**समाजभूषण रामदास वाघमारे**
**मो.नं.8888125610**
**लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक आहेत**

# राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्यायाच्या क्रांतीचे दोन महामेरू

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासात काही नाती अशी असतात की, ती केवळ दोन व्यक्तींमधील संबंध म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर ती संपूर्ण समाजाच्या परिवर्तनाची प्रेरणाशक्ती बनतात. असेच एक अद्वितीय, ऐतिहासिक आणि क्रांतिकारी नाते म्हणजे राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते होय.एकीकडे कोल्हापूर संस्थानचा लोककल्याणकारी राजा, सामाजिक समतेचा पुरस्कर्ता आणि आरक्षणाचा जनक म्हणून ओळखले जाणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज तर दुसरीकडे अस्पृश्यता, अन्याय आणि विषमतेविरुद्ध संघर्ष करून कोट्यवधी बहुजनांना स्वाभिमानाचे जीवन देणारे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या दोन महामानवांच्या विचारांची आणि कार्याची सांगड भारतीय सामाजिक क्रांतीचा पाया ठरली.

एका राजाने ओळखलेले युगपुरुष

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. जातीय भेदभाव, अपमान, शिक्षणातील अडथळे आणि सामाजिक बहिष्कार यांचा सामना करत त्यांनी ज्ञानाच्या बळावर स्वतःला घडवले. परंतु त्या काळी समाजातील बहुसंख्य लोकांना त्यांची प्रतिभा आणि नेतृत्वक्षमता समजून घेण्याची दृष्टी नव्हती.अशा वेळी राजर्षी शाहू महाराजांनी बाबासाहेबांमधील असामान्य नेतृत्व ओळखले. त्यांनी बाबासाहेबांना केवळ एक विद्वान तरुण म्हणून पाहिले नाही, तर भविष्यात बहुजन समाजाचे नेतृत्व करणारा क्रांतिकारी विचारवंत म्हणून पाहिले.शाहू महाराजांची ही दूरदृष्टी विलक्षण होती. कारण त्या काळात अस्पृश्य समाजातील व्यक्तीला नेतृत्वाची संधी देणे म्हणजे प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेलाच आव्हान देणे होते. पण शाहू महाराजांनी सत्याची बाजू घेतली आणि बाबासाहेबांच्या कार्याला पाठबळ दिले.

‘मूकनायक’ला मिळालेले राजाश्रय

सन १९२० मध्ये डॉ. आंबेडकरांनी वंचित, शोषित आणि अस्पृश्य समाजाचा आवाज बनण्यासाठी 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. परंतु आर्थिक अडचणी मोठ्या होत्या.या वेळी शाहू महाराजांनी आर्थिक मदत करून ‘मूकनायक’ला आधार दिला. हे केवळ आर्थिक



साहाय्य नव्हते; तो बहुजनांच्या आवाजाला दिलेला राजाश्रय होता.

ज्या समाजाला बोलण्याचा अधिकार नव्हता, त्याच्या वेदनांना शब्द देण्याचे काम बाबासाहेब करत होते आणि त्या आवाजाला बळ देण्याचे कार्य शाहू महाराज करत होते. त्यामुळे या दोघांचे नाते हे केवळ राजा आणि समाजसुधारक यांच्यातील नव्हते; ते सामाजिक परिवर्तनासाठी लढणाऱ्या दोन सहकाऱ्यांचे नाते होते.

माणुसकीच्या धाग्यांनी जोडलेले संबंध

शाहू महाराज आणि बाबासाहेब यांचे संबंध औपचारिक नव्हते. त्यामागे परस्पर आदर, विश्वास आणि समाजाबद्दलची तळमळ होती.

शाहू महाराजांनी अनेकदा सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये बाबासाहेबांचा गौरव केला. त्यांनी एका सभेत बाबासाहेबांविषयी बोलताना म्हटले होते की, “डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य समाजाचे अखिल भारतीय नेते होतील.”

हा केवळ गौरव नव्हता; ती भविष्यवाणी होती. पुढे इतिहासाने सिद्ध केले की शाहू महाराजांचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले.

डॉ. आंबेडकरांनीदेखील शाहू महाराजांविषयी अपार आदर व्यक्त केला. कारण त्यांना माहीत होते की, समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी सत्ता आणि विचार यांची सांगड आवश्यक असते. शाहू महाराजांकडे सत्ता होती आणि बाबासाहेबांकडे परिवर्तनवादी विचार. या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे सामाजिक न्यायाच्या लढ्याला नवी दिशा मिळाली.

सामाजिक न्यायाची समान भूमिका

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात अनेक साम्यस्थळे दिसून येतात.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षण सर्वांसाठी खुले केले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली. नोकऱ्यांमध्ये आरक्षण लागू केले. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. अस्पृश्यतेविरुद्ध कठोर भूमिका घेतली.दुसरीकडे बाबासाहेबांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारला. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली, महाड सत्याग्रह केला, मंदिरप्रवेश चळवळ उभारली आणि पुढे भारतीय राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना घटनात्मक संरक्षण दिले.दोघांच्याही कार्याचा केंद्रबिंदू एकच होता माणसाला माणूस म्हणून सन्मान मिळाला पाहिजे.

भारतीय समाजातील शतकानुशतकांच्या गुलामगिरीमुळे बहुजन समाजाचा आत्मविश्वास खचला होता. त्यांना त्यांच्या माणूसपणाचाही विसर पडावा अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

शाहू महाराजांनी त्यांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठेचे दार उघडून दिले. बाबासाहेबांनी त्यांना स्वाभिमान, अधिकार आणि संघर्षाची प्रेरणा दिली.

शाहू महाराजांनी बहुजनांना उभे राहण्यासाठी आधार दिला; बाबासाहेबांनी त्यांना चालण्याची दिशा दिली.म्हणूनच हे दोघेही बहुजनांच्या स्वाभिमानाचे शिल्पकार ठरतात.

आज आपण सामाजिक न्याय, आरक्षण, संविधान, समान संधी आणि मानवी हक्क यांविषयी बोलतो. परंतु या सर्व मूल्यांच्या पायाभरणीत शाहू महाराज आणि बाबासाहेब यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

आजही समाजात जातीय विषमता, सामाजिक अन्याय, शैक्षणिक असमानता आणि आर्थिक दरी दिसून येते. अशा वेळी शाहू महाराजांचा लोककल्याणकारी दृष्टिकोन आणि बाबासाहेबांचा संविधानवादी विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.त्यांचे नाते आपल्याला शिकवते की, परिवर्तनासाठी केवळ विचार पुरेसे नसतात आणि केवळ सत्ता देखील पुरेशी नसते. विचार आणि कृती यांचा संगम झाला की सामाजिक क्रांती घडते.

नव्या पिढीची जबाबदारी

आजच्या युवकांनी शाहू महाराज आणि बाबासाहेब यांचे नाते समजून घेणे आवश्यक आहे. कारण हे नाते द्वेषाचे नव्हे, तर समतेचे आहे. संघर्षाचे नव्हे, तर मानवमुक्तीचे आहे. सत्तेचे नव्हे, तर सेवाभावाचे आहे.त्यांनी समाजाला विभागण्याऐवजी जोडण्याचे काम केले. त्यांनी माणसाला त्याच्या जातीने नव्हे, तर गुणवत्तेने आणि माणुसकीने ओळखण्याचा संदेश दिला.त्यांचे विचार केवळ पुस्तकांमध्ये किंवा जयंती-पुण्यतिथीपुरते मर्यादित राहू नयेत. ते आपल्या आचरणात, सामाजिक वर्तनात आणि सार्वजनिक जीवनात उतरले पाहिजेत.

राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते हे भारतीय सामाजिक इतिहासातील एक तेजस्वी पर्व आहे. एका राजाने एका प्रतिभावान तरुणातील युगपुरुष ओळखला आणि त्याला आधार दिला. त्या युगपुरुषाने पुढे कोट्यवधी वंचितांच्या जीवनात स्वाभिमानाचा सूर्य उगवला.शाहू महाराज नसते तर बाबासाहेबांच्या संघर्षाला सुरुवातीच्या काळात आवश्यक पाठबळ मिळाले नसते; आणि बाबासाहेब नसते तर शाहू महाराजांनी रुजवलेल्या सामाजिक न्यायाच्या विचारांना अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले नसते.

म्हणूनच या दोन महामानवांचे नाते हे केवळ इतिहासातील एक प्रसंग नाही, तर सामाजिक समता, बंधुता आणि मानवमुक्तीच्या अखंड प्रवासाचे प्रेरणास्थान आहे.

आज त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण करणे नव्हे, तर त्यांच्या स्वप्नातील समतामूलक, न्याय्य आणि मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी स्वतःला वाहून घेणे. तेव्हाच राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल.

**लेखिका**
**मीरा रामदास वाघमारे**
**संचालिका माई वृद्धाश्रम छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8421141104**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## पडेगाव फायरिंग रेंजवर पोलिसांचा 'अग्निपरीक्षा' सराव; पाच महिने परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** ग्रामीण पोलीस दलाची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आणि अधिकारी-अंमलदारांची निशाणेबाजी अचूक करण्यासाठी आगामी पाच महिने पडेगाव परिसरात अत्याधुनिक शस्त्रांचा आवाज गुंजणार आहे. बुधवार, २५ जून २०२६ पासून ते थेट १८ नोव्हेंबर २०२६ या प्रदीर्घ कालावधीत पडेगाव येथील 'फायरबट' (फायरींग रेंज) वर वार्षिक गोळीबार सराव आयोजित करण्यात आला आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या या सरावामुळे कोणताही अनावधानाने होणारा अपघात किंवा जीवितहानी टाळण्यासाठी राखीव पोलीस निरीक्षक (पोलीस मुख्यालय, ग्रामीण) यांनी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची नियमावली जाहीर केली आहे.

**नागरिकांसाठी 'हे' नियम पाळणे बंधनकारक:**

**१. नो-एन्ट्री झोन:** नागरिकांनी सकाळच्या सत्रात पडेगाव डोंगररांगा आणि गोळीबार क्षेत्राच्या हद्दीत प्रवेश करणे पूर्णपणे टाळावे. हा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.

**२. शेतकरी आणि गुराख्यांना आवाहन:** या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर पाळीव जनावरे चरण्यासाठी आणली जातात. सरावादरम्यान गोळ्यांची दिशा भरकटण्याचा धोका असतो, त्यामुळे गुराख्यांनी आपल्या शेळ्या-मेंढ्या आणि गुरे या परिसरापासून दूर ठेवावीत.

**३. संशयास्पद वस्तूंना स्पर्श बंदी:** अनेकदा सरावादरम्यान काही काडतुसे किंवा गोळ्या न फुटता तशाच पडून राहतात. अशी कोणतीही वस्तू आढळल्यास नागरिकांनी कुतूहलापोटी तिला हात लावू नये; थेट स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा.

पोलीस प्रशासनाने हा सराव अत्यंत कडक सुरक्षेत घेण्याचे नियोजन केले असून, नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवरायांच्या विचारांचे स्मरण म्हणजे राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा

### सिडकोच्या शालिवाहन शाखेतर्फे हिंदू साम्राज्य दिन उत्साहात साजरा; डॉ. वि. ल. धारुरकर यांचे प्रतिपादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी






**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सिडको येथील शालिवाहन शाखेतर्फे एन-४ परिसरातील विवेकानंद उद्यान येथे हिंदू साम्राज्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव, त्यांच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांचे स्मरण आणि समाजजीवनात त्यांचे आदर्श रुजविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमास संभाजीनगर विभाग संघचालक बबनराव जगाडे, चिकलठाणा जिल्हा संघचालक विजय लेकूरवाळे, चंद्रगुप्त नगर संघचालक अशोक बाहेती, नगर कार्यवाह प्रसाद पैठणकर तसेच एन-४ वस्ती प्रमुख उदय देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून अनिल सूर्यवंशी तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. वि. ल. धारुरकर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ. धारुरकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ स्वराज्याची स्थापना केली नाही, तर दूरदृष्टी, सुयोग्य प्रशासन आणि राष्ट्रहिताचा आदर्शही घालून दिला. समुद्रावरील वर्चस्वाचे महत्त्व ओळखून त्यांनी सागरी दुर्ग उभारले, बलाढ्य आरमार निर्माण केले तसेच उद्योग आणि जलव्यवस्थापनाला चालना दिली. स्वराज्याच्या संकल्पनेत सर्व समाजघटकांना सामावून घेत अठरापगड जाती-पातींमध्ये एकात्मतेची भावना निर्माण केली. शिवरायांच्या कार्याचा गौरव परदेशी इतिहासकार, पत्रकार आणि साहित्यिकांनीही केला असल्याचे त्यांनी नमूद केले. हिंदू साम्राज्य दिन हा शिवरायांच्या कर्तृत्वाचे स्मरण करून त्यांना कृतज्ञ अभिवादन करण्याचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना शालिवाहन शाखा कार्यवाह शिवशंकर मुंडे यांनी केली. सूत्रसंचालन अमृता संचित पातुरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन उदय देशपांडे यांनी केले. यावेळी सुधीर गोस्वामी यांनी सादर केलेल्या जोशपूर्ण पोवाड्याने उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

कार्यक्रमादरम्यान पोवाडा सादर करणारे सुधीर गोस्वामी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सुरेश गुठ्ठे यांनी वाढदिवसानिमित्त केलेल्या अल्पोपहार व चहा व्यवस्थेबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. सभागृहासाठी फॅन, ट्यूबलाईट व फोकसची व्यवस्था उपलब्ध करून दिल्याबद्दल अ‍ॅड. संचित पातुरकर यांचाही संघचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास स्वयंसेवक, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



फर्दापूर जिल्हा परिषद गटात ७७ नवीन डीपींना मंजुरी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्यास यश. १८ गावांतील सुमारे ४ हजार शेतकऱ्यांना दिलासा. दि. 25 जून रोजी सावळदबारा येथे सावळदबारा सह परिसरातील शेतकऱ्यांना माहिती देताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यानी दिली.

## सोयगाव शहरात तेरा तास वीज पुरवठा ठप्प;-वीजपोल कोसळले

**सोयगाव :** सोयगाव शहरासह परिसरात बुधवरी रात्री झालेल्या वादळी वाऱ्याने वीजपोल काही ठिकाणी गाव पुरवठ्याचे रोहित्र कोसळल्या मुळे गुरुवारी सोयगाव शहरासह,आमखेडा,गलवाडा आदी भागातील वीजपुरवठा तब्बल तेरा तासांपेक्षा अधिक वेळ खंडित झाला होता त्यामुळे शहरातील शासकीय कार्यालये विजेच्या अभावी ठप्प झाले होते,त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे कामे झाली नव्हती दरम्यान वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण च्या वीज मंडळाने सकाळी आठ वाजेपासून मोहीम हाती घेतली होती परंतु सायंकाळी सहा वाजेपर्यंतही शहराचा वीज पुरवठा सुरळीत झाला नव्हता त्यामुळे शहरातील नागरिकांची चांगली च गैरसोय झाली होती

## सोयगाव शहरात एक तास जोरदार पाऊस;-शहरातील नाल्याला पूर

**सोयगाव :** सोयगाव शहरात गुरुवारी सायंकाळी सात ते रात्री आठ वाजेच्या सुमारास जोरदार पाऊस झाल्याने सोयगाव जवळील नाल्याला पूर आला होता दरम्यान सोयगाव शहरात झालेल्या या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे शहरात जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह पसरला आहे दरम्यान रात्री झालेल्या रिमझिम पावसाने गुरुवारी सोयगाव शिवारात कपाशीसह,मका,आदी पिकांची पेरण्या झाल्या होत्या आणि त्यातच पाऊस झाल्याने उत्साह वाढला आहे दरम्यान मंगळवारी झालेल्या पावसाने शिवारात कपाशीच्या लागवडीसाठी सुरुवात झाली होती या आधीच शहर परिसरात शेतकऱ्यांनी मॉन्सून पूर्व कपाशीच्या लागवड केली होती त्या पिकांना हा पाऊस फायदेशीर ठरला आहे...

## शहरातील पाणीपुरवठा, शाळा, गुंठेवारी व हेरिटेज प्रश्नांवर काँग्रेस आक्रमक

### माजी शहराध्यक्ष इब्राहिम पठाण व शहराध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम यांच्या नेतृत्वाखाली आयुक्तांना निवेदन



**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** शहरातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, गुंठेवारी नियमितीकरण, हेरिटेज समितीची प्रलंबित कामे तसेच मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांवरील विविध कर व शुल्कांच्या प्रश्नांबाबत छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने महानगरपालिका प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या विविध मागण्यांसंदर्भात माजी शहराध्यक्ष इब्राहिम पठाण व शहराध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम सय्यद अब्बास यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

निवेदनात महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांना मालमत्ता करातून सूट देण्याची मागणी करण्यात आली. गोरगरीब व अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण या शाळांमधून होत असल्याने त्यांना विविध कर व शुल्कांमधून दिलासा देणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले.

शाळांना फायर ब्रिगेड एनओसी शुल्क पूर्णपणे माफ करण्याची मागणी

शाळा व रुग्णालयांच्या इमारतींना फायर ब्रिगेड एनओसीसाठी समान शुल्क आकारले जात असल्याचा मुद्दा काँग्रेसने उपस्थित केला. शैक्षणिक संस्था समाजहितासाठी कार्यरत असल्याने शाळांना विशेष सवलत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

विशेषतः चॅरिटेबल स्वरूपाच्या व गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शाळांना फायर ब्रिगेड एनओसी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे. तसेच संबंधित विभागांनी ना हरकत प्रमाणपत्रे (NOC) जलद गतीने जारी करावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

गुंठेवारी, हेरिटेज व बांधकाम परवानग्यांबाबत निर्णयाची मागणी

गुंठेवारी नियमितीकरणाच्या प्रकरणांमध्ये नागरिकांना मोठा विलंब सहन करावा लागत असल्याने संचिकांची ऑनलाइन छाननी करून तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अनेक महिन्यांपासून हेरिटेज समितीची बैठक न झाल्यामुळे बांधकाम परवानग्या व इतर महत्त्वाची प्रकरणे प्रलंबित असल्याचे काँग्रेसने निदर्शनास आणून दिले.

## विभागीय कृषी सहसंचालक वानखेडे यांचा 'ग्रामविकास' तर्फे सत्कार




**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांना महाराष्ट्र शासनच्या कृषी विभागाचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार २०२३ जाहीर झाल्याबद्दल ग्रामविकास संस्थेतर्फे त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि 'सर्वांसाठी पाणी' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव नरहरी शिवपुरे, बीडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, प्रगतशिली शेतकरी निवृत्ती घोडके, राहुल देवांग यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुनील वानखेडे हे मितभाषी असून, शेतकरी वर्गात कमालीचे लोकप्रिय आहेत. शेतीविषयक विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी सुनील वानखेडे यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त मुंबई येथे राज्यपाल विष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यंत्रणा सज्ज ; शिबिरातून काँग्रेसकडून बुथ संघटन बळकट करण्यावर भर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील काँग्रेस पक्ष नव्या जोमाने संघटनात्मक बांधणीसाठी कार्यरत असून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत काँग्रेसची विचारधारा आणि पक्ष संघटना पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणे, त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणे आणि रात्रंदिवस उपलब्ध राहून त्यांच्या अडचणी सोडविणारे प्रदेशाध्यक्ष अशी त्यांची ओळख राज्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्याच अनुषंगाने, डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अधिकृत पनवेल विधानसभा १८८ BLA-1 यंत्रणेमार्फत BLA-2 प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे. या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते हनुमंत पवार, SIR प्रशिक्षक ॲड. अरविंद कुमार द्विवेदी तसेच पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक हरीश केणी हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणामध्ये मतदार यादीतील नावांची पडताळणी, नवीन मतदार नोंदणी, नावांमधील दुरुस्ती, मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, BLA-2 ची जबाबदारी, बूथ व्यवस्थापन तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांनी सांगितले की, पनवेल विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक बूथ सक्षम करणे, प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा हक्क मिळवून देणे आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अधिकृत BLA-1 टीमच्या माध्यमातून बूथ स्तरावर संघटन अधिक बळकट करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला नगरसेवक हरीश केणी, कार्याध्यक्ष शशिकला सिंग, उपाध्यक्ष चेतन म्हात्रे,अमित दवे, विलास म्हात्रे, जयवंत देशमुख, कॅप्टन.कलावत,सोनटक्के सर, डॉ.विजयकुमार चव्हाण, जोश जेम्स ,प्रदीप सुनखे, कुलदीप नेटके, स्वप्निल पवार, अभिजीत मुंडक्कल, सायरा मॅडम, सोनिया मॅडम यांच्यासह महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, NSUI, सेवा दल, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, बूथ अध्यक्ष ,लोकशाही मानणाऱ्या विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

## “आपली व्यक्ती आपली शाळा” पालक वर्गात वातावरण आनंदाचे!

### जेएनपीए प्रशासनाने संस्थेवर टाकलेला विश्वास सार्थ करु : नरसू पाटील

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण / रायगड :** शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या साई संस्था (ट्रस्ट) डोंबिवली यांच्या शैक्षणिक संकुलाकडे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षा पासून जेएनपीए मराठी मध्यम आणि इंग्रजी माध्यम या दोन्ही विद्यालयाचा कारभार आत्ता साई संस्थेच्या हातात आला असल्यामुळे परिसरांतील पालक वर्गात आनंदाचे वातावरण असून उरण परिसरांतून जेएनपीएचे अध्यक्ष,सेक्रेटरी आणि या संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्यावर अभिनंदनाच वर्षाव होत आहे.

महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साईसंस्था (ट्रस्ट) डोंबिवली या संस्थेच्या वतीने डोंबिवली येथे मराठी, गुजराथी, इंग्रजी मध्यमाच्या बरोबरीने गत वर्षी आणखीन एक स्कूल सुरु केले आहे. संस्था गेली १८ वर्षा पेक्षा अधिक काळ कार्यरत आहे,तर रायगड-माणगाव येथे गेली २४ वर्षा पेक्षा अधिक काळ इंग्रजी माध्यमाचे स्कूल कार्यरत आहे,या सर्व शैक्षणिक वर्षात या सर्व विद्यालयाने आपल्या शालांत परीक्षेच्या १०० % टक्के निकाल लाऊन निकालाची यशस्वी परंपरा आजही राखून ठेवली आहे. मागील चार वर्षात संस्थेच्या वतीने उरण येथे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल व बरोबरीने कोल्हापूर गडहिंग्लज येथे इ.बी.गडकरी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत असून गत वर्षी नरसू पाटील कॉलेज ऑफ फ़िजिओ थेरपी या आणखी एका नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश या साई संस्थेच्या शैक्षणिक संकुलात झालेला आहे.

साई संस्था(ट्रस्ट)ने शैक्षणिक क्षेत्रात उतुंग भरारी घेतली असतानाच या सर्व शैक्षणिक बाबीची देशांतील नंबर वन असणाऱ्या जेएनपीए प्रशासनाने दखल घेत प्रकल्पग्रस्थ असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा उद्दात हेतू विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक भविष्य लक्षात घेऊन उरण येथील जेएनपीए वसाहत संकुलात असणाऱ्या जेएनपीए विद्यालयाच्या मराठी माध्यमासह यंदाच्या २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देण्याची धुरा साई संस्थेवर पासून टाकली आहे.

या संदर्भात आमच्या प्रतिनिधी बरोबर बोलताना साईस्थेचे(ट्रस्ट)चे अध्यक्ष नरसू पाटील म्हणाले की मी

## हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या बैठकीत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीप वाकडे यांचा सत्कार

**हिंगोली प्रतिनिधी :** हिंगोली|कळमनुरी येथील रेस्ट हाऊस येथे हिंदू सुरक्षा सेवा संघाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजूदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झालेल्या संदीप वाकडे सरकार यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संदीप वाकडे यांना पुष्पहार व शाल देऊन अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या माध्यमातून हिंदू समाजाच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीत संघटनात्मक बांधणी, आगामी कार्यक्रम तसेच हिंदू समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष राजूदासजी महाराज यांच्या विचारांनुसार संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी जिल्हा प्रभारी राहुल मेने, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद बेद्रे, कळमनुरी तालुका अध्यक्ष अशोकराव मस्के, वसमत तालुका अध्यक्ष अर्जुन बर्डे, कळमनुरी शहराध्यक्ष अंकुश उर्फ जिद्दी पाटील, वसमत तालुका उपाध्यक्ष मंगेश पांचाळ, बाळापूर अध्यक्ष वैभव गिरे, युवा शहराध्यक्ष गोविंद भिवरकर, गजानन चव्हाण यांच्यासह हिंदू सुरक्षा सेवा संघाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीचा समारोप संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या निर्धाराने करण्यात आला.

## रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठान, करंजाडे, पनवेल तर्फे विकासासाठी रत्नागिरीकरांना एकत्र येण्याचे आवाहन

### संस्थेत सहभागी होण्याचे रत्नागिरीकरांना आवाहन, सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम राबविणार

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण / रायगड - प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या विविध सामाजिक संस्था संघटना कार्यरत आहेत.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी व परिसरातील समाज बांधवांच्या विकासासाठी या विविध सामाजिक संस्था संघटना झटत असतात. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध समाज बांधव, नागरिकांची एक सामाजिक संस्था असावी या दृष्टीकोणातून रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठान करंजाडे पनवेल या संस्थेची स्थापना झाली असून रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या संघटनेत मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन या संघटनेतर्फे रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांना अर्थातच रत्नागिरीकरांना केले आहे.

दि. ९ मार्च २०२६ रोजी सामाजिक कार्यकर्ते योगेश रमेश आगरे, करंजाडे सेक्टर ६, यांनी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गुजर, सेक्टर ४, यांच्याकडे संकल्पना मांडली कि, आपल्या पनवेल तालुक्यातील करंजाडे शहरामध्ये सर्व जिल्ह्यातील सामाजिक संस्था कार्यरत आहेत. तर आपल्या रत्नागिरी जिल्ह्याची सामाजिक संस्था का असू नये! आणि इथूनच या दोघांच्या डोक्यात चक्र फिरू लागली. त्यानंतर प्रत्येक इमारती मध्ये जशी ओळख असेल त्याप्रमाणे त्यांनी रत्नागिरीकर बांधव शोधण्यास सुरुवात झाली. यातूनच दिनेश धामणस्कर, प्रशांत भेकरे, संजय चाळके, नेहा मोरे, समीक्षा भायजे, आणि रमेश आगरे अशी जवळपास ४० उत्सुक मंडळी लाभली. दि. १० मार्च २०२६ रोजी एक बैठक घेऊन पुढील दिशा ठरविण्यात आली. आणि बघता बघता १०९ बांधव जमा झाले. पुढे काय ? असा सवाल उपस्थित झाला. यावेळी पुढे काय करायचे याबाबत सर्वांनी एकमुखी निर्णय घेतला.सर्वांनी या संस्थेचा उद्देश ठरविले. रत्नागिरी तसेच करंजाडे मधील रत्नागिरी बांधवांच्या मुलांना जे चांगल्या मार्कानि उत्तीर्ण होणारे विद्यार्थी आहेत त्यांचा यथोचित सत्कार करून भावी आयुष्यास प्रोत्साहन देणे. महिला वर्गाचे बचत गट तयार करणे, ग्रामीण उत्पादनांना प्रोत्साहन देणे. वधूवर सूचक समिती नेमणे. जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने




गर्भसंस्कार कार्यक्रम घेणे. पावसाळ्यात वृक्षारोपण करणे. करंजाडेत कोणी व्यवसाय करत असेल त्याला प्रोत्साहन देणे. दिवाळी पहाट ऐवजी दिवाळी संध्या कार्यक्रम घेणे. ग्रामीण सांस्कृतिक कलांना प्रोत्साहन देणे. उदा. जाखडी, नमन, गणपती शिमग्याला पनवेल एस.टी. डेपोतून बस सोडणे. अशा विविध उद्दिष्ट संस्थेचे ठरविण्यात आले. तसेच रत्नागिरीकर बांधवांच्या सुखः दुखाला धावून जाण्यास अग्रक्रम देणे हे सुद्धा उद्देश संस्थेचे ठरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गुजर यांनी तसेच सर्व पदाधिकारी सदस्यांनी आवाहन केले की

बांधवांनो, आपण करंजाडेत संख्येने कमी असलो तरी आपल्यातील गुणवत्तेच्या जोरावर सर्वांनी एकत्र येऊन आपल्या विचारांची मोठ बांधली तर, आपण योजिलेले अनेक उद्धेश तडीस नेऊ शकतो यात शंका नाही. त्याकरिता केवळ मनाचा निश्चय करणे गरजेचे आहे आणि तो फक्त आपल्या निर्णयाच्या एका क्लिकवर अवलंबून आहे. तर, चला आपले रत्नागिरीकर बांधव करंजाडेत कोठे आहेत ते शोधूया आणि त्यांना ह्या प्रवाहात आणूया असे आवाहन आम्ही रत्नागिरीकर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत महादेव गुजर,उपाध्यक्ष रमेश गोपाळ आगरे, कार्याध्यक्ष संजय चाळके,सचिव दिनेश गणपत धामणस्कर सचिव, खजिनदार योगेश रमेश आगरे,सहसचिव प्रशांत पांडुरंग भेकरे,सदस्य नेहा सुधाकर मोरे यांनी केले आहे.जे कोणी रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिक करंजाडे परिसरात आहेत त्यांनी या संस्थेचे पदाधिकारी सदस्य यांच्याशी संपर्क साधावा व संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

अधिक माहिती व सदस्य बनण्यासाठी दिनेश धामणस्कर 88280 93020, प्रशांत भेकरे 95949 84209, रमेश आगरे 79772 39703 यांच्याशी संपर्क साधावे.

### उपसभापती अश्विनीताई सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश

## खामगाव टपाल कार्यालयातील रिक्त पद लवकरच भरणार



**फुलंब्री प्रतिनिधी :** फुलंब्री तालुक्यातील खामगाव शाखा टपाल कार्यालयातील रिक्त पदामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब पंचायत समिती फुलंब्रीच्या उपसभापती सौ. अश्विनीताई अजिनाथ सोनवणे यांनी डाक विभागाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत भारतीय डाक विभागाने रिक्त पद भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वरिष्ठ अधीक्षक डाकघर कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, खामगाव शाखा टपाल कार्यालय हे एकल-हस्त (Single-Handed) कार्यालय असून सध्या कार्यालयाचा कारभार पर्यायी व्यवस्थेद्वारे चालविला जात आहे. संबंधित बीपीएम (शाखा पोस्टमास्तर) पदासाठी नियमानुसार निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून निवड झालेल्या उमेदवाराने आवश्यक प्रशिक्षणही पूर्ण केले आहे.

डाक विभागाने संबंधित उमेदवारास तातडीने रुजू होण्याचे आदेश दिले असून लवकरच ते कार्यभार स्वीकारणार आहे. त्यामुळे खामगाव परिसरातील नागरिकांना टपाल सेवांचा अधिक वेगवान व नियमित लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यासंदर्भात उपसभापती सौ. अश्विनीताई सोनवणे यांनी नागरिकांच्या सोयीसाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीच्या कामकाजाचा आढावा

## घरकुल, माता रमाई, दिव्यांग व विविध कल्याणकारी योजनांवर सविस्तर चर्चा




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीची आढावा बैठक गुरुवारी समितीचे सभापती जालिंदर शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस समिती सदस्य अशोक दामले, काकासाहेब काकडे, नगरसेविका मीना खरात, भाग्यश्री साळवे, सावित्री वाणी, सुनीता वाहुळ यांच्यासह अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपआयुक्त तथा नगर सचिव नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे, लाखिचंद चव्हाण तसेच पंतप्रधान आवास योजना विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी घरकुल योजना, माता रमाई आवास योजना, दिव्यांग कल्याण योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (NULM), समाज कल्याण समिती तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषद (DPDC) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. योजनांच्या प्रगतीचा आढावा घेताना समिती सदस्यांनी विविध सूचना व मुद्दे मांडले.

बैठकीच्या शेवटी सभापती जालिंदर शेंडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत तसेच प्रलंबित बाबी तत्काळ मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

# अनुसूचित जाती आरक्षणाचे उप-वर्गीकरण करा; लहु प्रहार संघटनेचे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर 'नारळ अभिषेक' आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर:** सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानुसार महाराष्ट्रात अनुसूचित जाती (SC) आरक्षणाचे उप-वर्गीकरण तातडीने लागू करण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी 25 रोजी 'लहु प्रहार' संघटनेच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर जोरदार 'नारळ अभिषेक' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनानंतर संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संतोष शंकरराव पवार यांच्या नेतृत्वाखाली विभागीय आयुक्तांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात लहु प्रहार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष पवार यांच्यासह कचरू फावडे, काकासाहेब नाडे, मच्छिंद्र वाहुळकर, समाधान इच्चे, राजू अहिरे, आनंद बोबडे, रतन शेलार, सुनील थोरात, महिला आघाडीच्या रूपाली पवार, लता अहिरे, मंदाबाई वाघमारे, सविता घोरपडे आणि कैलास भामेराव यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.




निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातीच्या उन्नतीसाठी तरतुदी केल्या असल्या, तरी आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समप्रमाणात पोहोचलेला नाही. अनुसूचित जाती अंतर्गत अनेक वंचित घटक आजही शिक्षण, नोकरी आणि प्रशासनात अत्यंत मागास आहेत. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी 'स्टेट ऑफ पंजाब विरुद्ध देवेंद्र सिंग' खटल्यात राज्य सरकारांना उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार मान्य केला आहे. या निर्णयाच्या धर्तीवर पंजाब, हरियाणा, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यांनी उप-वर्गीकरण लागू केले असून, महाराष्ट्रातही ते तातडीने लागू करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर अनुसूचित जातीचे उप-वर्गीकरण करून वंचित समाजाला आरक्षणाचा न्याय वाटा द्यावा. आरक्षणाचे उप-वर्गीकरण होईपर्यंत राज्यातील सर्व क्षेत्रांतील नोकरभरती प्रक्रिया तात्काळ बंद ठेवावी. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसूचित जातीतील बौद्ध समाज वगळता इतर घटकांना नाकारण्यात आलेले आरक्षण पुनश्च लागू करावे. वाढत्या खाजगीकरणामुळे शासकीय नोकऱ्या कमी होत असल्याने खाजगी क्षेत्रातील उद्योग, कंपन्या, रुग्णालये आणि सेवा क्षेत्रात अनुसूचित जातींसाठी आरक्षण लागू करावे. क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाचे पुनर्गठन करावे, तसेच संत रविदास महाराज चर्मकार समाज अभ्यास आयोग आणि महर्षी वाल्मिकी अभ्यास आयोग स्थापन करावा. साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावे.

# एमजीएमच्या 'इन्विटेशन फुटबॉल टूर्नामिंट'मध्ये शहानूर स्पोर्टिंग क्लबचा विजेतेपदावर कब्जा

## रोमांचक अंतिम सामन्यात स्ट्रीट फुटबॉल क्लबवर 2-1 ने मात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे ७९ व्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेली 'इन्विटेशन फुटबॉल टूर्नामिंट-२०२६' मोठ्या उत्साहात आणि खेळाडूवृत्तीच्या वातावरणात एमजीएम स्टेडियमवर यशस्वीपणे संपन्न झाली. शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत १२ संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




स्पर्धेच्या समारोपप्रसंगी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, क्रीडा विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे यांच्यासह प्राध्यापक, खेळाडू आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील उपांत्य आणि अंतिम सामने अत्यंत चुरशीचे झाले. पहिल्या उपांत्य फेरीत शहानूर स्पोर्टिंग फुटबॉल क्लबने आझाद फुटबॉल क्लबवर १-० अशी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना शहानूर स्पोर्टिंग फुटबॉल क्लब आणि स्ट्रीट फुटबॉल क्लब यांच्यात रंगला. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झालेल्या या थरारक सामन्यात शहानूर स्पोर्टिंग क्लबने २-१ असा विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

**स्पर्धेचा निकाल :** विजेता - शहानूर स्पोर्टिंग फुटबॉल क्लब, उपविजेता - स्ट्रीट फुटबॉल क्लब, तृतीय क्रमांक - आझाद फुटबॉल क्लब

स्पर्धेचे सामने यशस्वीपणे पार पाडण्यात पंचांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. हुसेन, हमीद, पियुष, पवन, अब्दुल्ला खान, आदिल, माजिद आणि शोहेब यांनी उत्कृष्ट पंचगिरी केली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. रहीम खान, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. शशिकांत सिंग, निलेश खरे आणि ऐश्वर्या आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच मैदान व्यवस्थापनाची जबाबदारी लक्ष्मण सूर्यवंशी आणि भाऊसाहेब यांनी समर्थपणे सांभाळली.

बक्षीस वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. श्रीनिवास मोतीयेळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई यांनी केले.

स्पर्धेतील विजेत्या संघाचे तसेच स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे एमजीएमचे कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर आणि क्रीडा संचालक नितीन घोरपडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लाडसावंगी प्रकरणी जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू

## अनुसूचित जातीच्या महिला कर्मचाऱ्यावरील कथित अत्याचारप्रकरणी कारवाईची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, ता. २५ :** लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अनुसूचित जातीच्या महिला कर्मचाऱ्यावर कथित अत्याचार करण्यात आल्याचा आरोप करत आंबेडकरवादी पँथर सेना व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने गुरुवारपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आली.



प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंबेडकरवादी पँथर सेनेचे किरण तुपे, राहुल भालेराव, अनिल भालेराव, लहू साबळे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी दिला.

संबंधित महिला कर्मचाऱ्याला वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जातिवाचक शिवीगाळ, मानसिक तसेच शारीरिक छळ सहन करावा लागल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या संदर्भात तक्रार दाखल करूनही संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# 348 प्रकारची औषधे दान करून उरणच्या तोगरे दाम्पत्याचा समाजोपयोगी उपक्रम

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र, जीते येथे उरण मधील जेष्ठ समाजसेवक एस. आर. तोगरे तथा समाजसेविका सुमनताई संग्राम तोगरे महाराष्ट्र शासन पुरस्कारित यांच्या वतीने ३४८ प्रकारची औषधे मोफत दान करण्यात आली. या औषधांची अंदाजे किंमत सुमारे एक ते सव्वा लाख रुपये किमतीची आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक औषधे सहज उपलब्ध व्हावीत तसेच आरोग्य सेवेला बळकटी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या औषधदानामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना मोठा लाभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा माळगे, औषध निर्माण अधिकारी श्रीमती रुपाली म्हात्रे, लॅब टेक्निशियन श्रीमती प्रियांका लोहार, आरोग्य निरीक्षक उदय म्हात्रे व राजेश म्हात्रे, आरोग्य सेवक भूषण पाटील, स्टाफ नर्स श्रीमती सुनीता गवळी, स्त्री परिचर श्रीमती ज्योत्स्ना दळवी तसेच सफाई कामगार श्रीमती प्रफुल्ला नाईक उपस्थित होते.




उपस्थितांनी जेष्ठ समाजसेवक एस. आर. तोगरे व जेष्ठ समाज सेविका सुमनताई संग्राम तोगरे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत या उपक्रमाचे स्वागत केले.विशेष म्हणजे, तोगरे दांपत्याने आजपर्यंत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांतील १६८ शासकीय रुग्णालये तसेच अनेक नोंदणीकृत सामाजिक संस्थांना दोन कोटी रुपयांहून अधिक किमतीची औषधे दान केली आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यामुळे आरोग्य क्षेत्रात सामाजिक सेवेचा नवा आदर्श निर्माण झाला असून, त्यांनी केलेली ही सेवा अतुलनीय,उल्लेखनीय मानली जात आहे.

# जलजीवन मिशनमध्ये गैरव्यवहाराचा आरोप; प्रहारच्या आंदोलनाचा प्रयत्न पोलिसांनी रोखला

## टाकळी कोलते व तळेगाव येथील कामांबाबत चौकशीची मागणी; 6 जुलैला प्रत्यक्ष पाहणीचे प्रशासनाचे आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** फुलंब्री तालुक्यातील टाकळी कोलते आणि तळेगाव येथील जलजीवन मिशन योजनांमध्ये कथित अनियमितता झाल्याचा आरोप करत प्रहार युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष राहुल काकडे यांनी गुरुवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी हस्तक्षेप करून त्यांना आंदोलन करण्यापासून रोखले. प्रशासनाने चौकशीचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.



राहुल काकडे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दिलेल्या निवेदनात टाकळी कोलते आणि तळेगाव येथील जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचा आरोप केला आहे. टाकळी कोलते येथे जलकुंभ, वितरण पाईपलाईन व घरगुती नळजोडण्यांची कामे अपूर्ण असतानाही ती पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच तळेगाव येथे उंच पाणी साठवण टाकी, जलकुंभ आणि वितरण व्यवस्थेची कामे प्रत्यक्षात पूर्ण नसतानाही खर्च दाखविण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्यात यावी तसेच दोषी अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रहार युवा आघाडीच्या वतीने करण्यात आली. या मागणीसाठी प्रहारच्या शैलीतील अनोखे आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून आंदोलन रोखले.

यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत ६ जुलै रोजी संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे राहुल काकडे यांनी सांगितले. मात्र, चौकशीनंतरही ठोस कारवाई झाली नाही तर अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

**चौकट**

**६ जुलैला होणार प्रत्यक्ष पाहणी**

जलजीवन मिशनच्या कामांबाबत करण्यात आलेल्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने ६ जुलै रोजी टाकळी कोलते व तळेगाव येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याचे आश्वासन दिले आहे. या पाहणीनंतर चौकशी अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# गावात मुक्काम करून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांचा ग्रामस्थांशी थेट संवाद

## ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांची दिली माहिती; समस्या जाणून घेत दिल्या तत्काळ सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासोबतच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी वैजापूर तालुक्यातील लासुरगाव येथे मुक्काम करून ग्रामस्थांशी संवाद साधला.

दि. २४ जून २०२६ रोजी लासुरगाव येथे मुक्कामी राहिलेल्या सोळंके यांनी सायंकाळी गावफेरी काढून गावातील विविध समस्यांची पाहणी केली. ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी शाळांचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, पशुवैद्यकीय अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. गावातील विकासकामे, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यासंदर्भातील बाबींचा आढावा घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.



दरम्यान, गावातील आरोग्य उपकेंद्राच्या भेटीदरम्यान प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गरोदर मातेला सुरक्षित बाळंतपण झाल्याची माहिती मिळाली. आरोग्य कर्मचारी गावात मुक्कामी राहून सातत्याने सेवा देत असल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत त्यांचे कौतुक केले.

सोळंके यांनी पीएमश्री हायस्कूल तसेच जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळेला भेट देऊन शाळेची इमारत, क्रीडांगण, प्रयोगशाळा, एस्ट्रोलॅब व ग्रंथालयाची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले.



गावातील घरकुल लाभार्थी व महिला बचत गटांशी संवाद साधताना त्यांनी लाभार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. घरकुलाच्या हप्त्यांचे वितरण वेळेत करण्याबाबत सूचना देत बांधकामे लवकर पूर्ण करण्याचे आवाहन केले. तसेच महिला बचत गट व एकल महिला बचत गटांच्या माध्यमातून स्वावलंबनासाठी उपलब्ध संधींबाबत मार्गदर्शन केले.

गावातील गरीब एकल महिला बचत गट सदस्या व घरकुल लाभार्थी शोभा बाळासाहेब नेटके यांच्या घरी जाऊन त्यांनी भोजन केले. तसेच ग्रामस्थांनी घरी मुक्कामासाठी आग्रह धरला असतानाही त्यांनी मंदिराच्या निवासस्थानी मुक्काम करण्यास प्राधान्य दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी ग्रामस्थांसमवेत योग व प्राणायाम कार्यक्रमात सहभाग घेतला. महिला बचत गटांच्या व्यवसायांची पाहणी केली. तसेच गाव परिसरात वड व आंब्याच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. आगामी वटसावित्री पौर्णिमेनिमित्त मोठ्या प्रमाणात वटवृक्ष लागवडीचा संकल्प ग्रामस्थ व महिला बचत गटांनी व्यक्त केला.

या भेटीदरम्यान जिल्हा परिषद सदस्या संगीता सुभाष तांबे, पंचायत समिती सदस्या अर्चना आप्पासाहेब शेलार, राहुल पाटील शेळके, सरपंच नंदाताई वसंत हुमे, उपसरपंच रितेश मुनोत, शोभा बाळासाहेब नेटके, गटविकास अधिकारी ज्ञानदेव जायभाये, विस्तार अधिकारी रंजना राठोड, ग्रामपंचायत अधिकारी नानासाहेब राहिंज, शाखा अभियंता मनोज उडान, उमेद तालुका व्यवस्थापक सचिन गिलके, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता राहुल अल्हाट, मुख्याध्यापक सुरेश राऊत, सनी गायकवाड, समुदाय आरोग्य अधिकारी केतन गुंजाळ, आरोग्य सेविका सुनिता दौड, आरोग्य सेवक योगेश उबाळे, पशुवैद्यकीय अधिकारी एकनाथ पांडवे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. .

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911